# अष्टक संग्रह

Ashtak Sangraha — Ashtaks of Khandoba, Bhairav and Devi · Keshav (Ashtak 2) and others, unattributed

## खंडोबा — अष्टक १ ले

समर्था मल्हारी परम पुरुषा पार न कळे ।
शिवा विश्वधारा हृदयी जपता पालक कळे ।
दीनाच्या दातारा ठाव तुजविण सर्व नामिली ।
दयाळा मैराळा सकळ जन पाळा महिपती ॥१ ॥

शशी रेखा भाळी शिरी मुकुट दिव्यांबर ल्ये ।
गळा माळा भाळा कनक तनु भंडार उधळे ।
उभा गंगा गौरी उभय निळ अंकी विलसती ।
दयाळा मैराळा सकळ जन पाळा महिपती ॥२ ॥

कसा होशी अश्वारूढ करी खड्ग असे ।
मणिमल्ल युद्धी आणि क्षीण ब्रह्मांडु लटके ।
तुझे धाके वैरी पटः पटः शतः प्राण त्यजिती ।
दयाळा मैराळा सकळ जन पाळा महिपती ॥३ ॥

अनाथांच्या नाथा अभिनव कसे रूप धरिले ।
पलापे खेळा असुर मारणे मल्लासी वधिले ।
निमी लेकी तुझी स्तुति निजमुखी वेद करिती ।
दयाळा मैराळा सकळ जन पाळा महिपती ॥४ ॥

तुझे पायी राहो अचळ मन माझे निशिदिनी ।
भवाब्धी हा तारी तुजविण दुजे अन्य न मनी ।
त्वरेने गोसावी मूर्ति प्रभु करी आस पुरवी ।
दयाळा मैराळा सकळ जन पाळा महिपती ॥५ ॥

## खंडोबा — अष्टक २ रे

साली गूढ मी दृढ चिन्ही असेना ।
तुझे ध्यान चिद्रूप देही दिसेना ।
नसे शक्ति सत्कीर्तिनी गुण गाया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥१ ॥

अधैर्यपणे चित्त हे चंचलत्व ।
न जाणो महापंच भुलादिलत्व ।
नव्हे योग अभ्यास कांही अराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥२ ॥

आम्हा ज्ञान विज्ञान सज्ञान नाही ।
वृथा पुष्ट हो सर्वदा सर्व देही ।
त्वरे लागल वाळ पाही धराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥३ ॥

आम्ही खेचरी भूचरी काय जाणो ।
प्रपंचिक व्यवहार हा सर्व मानो ।
त्वरे सर्व आयुष्य लागे सराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥४ ॥

उघडेना कधी योग तीर्थाटनाचा ।
न घडेल कधी संग साधु जनांचा ।
नव्हे नाम की नित्य नाम स्मराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥५ ॥

बहु आळशी भ्रान्ती दुर्वासनेचा ।
मना छंद तो इंद्रिये पोषणाचा ।
नदी दुथडी नाव जुनी तराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥६ ॥

मनी कुत्सिता येत नाना पुकारी ।
चुकेना पुनर्जन्म त्याचे विकारी ।
उपायास तू सांग भाले तराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥७ ॥

दिनानाथ तू दीन बंधू दयाळा ।
त्वरे धांव रे प्रेमळीच्या नृपाळा ।
म्हणे केशव क्लेश माझे हराया ।
कसा तारिसी स्वामी मार्तंड राया ॥८ ॥

## खंडोबा — अष्टक ३ रे

त्रिलोक्यी मणिमल्ल दैत्य सकळ अनिवार्य झाले महि ।
तेणे ब्राह्मण यज्ञ होम हवने विध्वंसिले सर्वही ।
आले ते समयी सदाशिव स्वये सोडूनी ब्रह्मांड हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥१ ॥

संग देउनि सप्तकोटी गण हे आले असे भूतळा ।
खंडेराय म्हणूनिया हार गळा सुखसंपत्तीची निळा ।
सत्क्रोधे मणिमल्ल मर्दुनि पहा केले असे हेतु हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥२॥

संतोषे जन सर्वदा उधळिती भंडार देवावरी ।
आपणसे विजयी म्हणूनी दिवव्या लखलखीत्या प्रेमे ।
केल वास शिवे लक्ष्या उजळल्या निद्रा छिले ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥३॥

घेतां हा भंडार तूप दमना सोङ्गाग्य हे राखिले ।
गाजी ब्राह्मण सदा होम हवने धर्मस्थळे स्थापिले ।
गाती भक्त मुनी सिद्धी जन सदा सत्कीर्ती उदंड हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥४॥

प्रारंभी स्थळ प्रेमरी लयपुरी वाढीस झाल असे ।
नळदुर्गी निसरे विशेष चवरे हे जेजुरी चे दिसे ।
सातारा हिवी पांचवा किल्ल्यांत पृथ्वील नवखंड हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥५॥

शोभे दिव्य कळा सुरंग पिवळा आषाढ पर्यंत हो ।
आले लोचन पाहला मुखमराशी तो म्हाळसाकांत हो ।
अश्वारूढ करी स्वयंभू सकळे तो शांत मार्तंड हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥६॥

कोणा हया कुळ देवतासी नमुनी जो नित्य भावे भजे ।
त्याला काम उणे न मागलाच सदनी अप्राप्त वस्तु ।
दासा देईल भुक्ति मुक्ति सकळी नासोनी पाखंड हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥७॥

मार्गी अष्टक जो वठेल अथवा देखील नित्याचरणी ।
त्याचा हो सकळ काळ दास्य करुनी राहील हा हो खरे ।
तेथे हा निजरंग पूर्ण भरल वाकनिया बंधु हो ।
तो हा पाहू चला कृपाळ निधी मल्हारी मार्तंड हो ॥८ ॥

---

## खंडोबा — अष्टक ४ थे

मर्दोनी मणिमल्ल प्रेमपुरी विराजे ।
व्यालागी भक्तजन वत्सल नामसाजे ।
भक्तांसी रक्षानि सदा भय सर्व वारी ।
मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥१ ॥

त्याचे सदा विळसली निध वाम भागी ।
ते म्हाळसा सुनराला वर हात कांगी ।
दासासी जो निजसुखे भवसिंधु तारी ।
मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥२ ॥

देवानिया चरण पंकज छत्र मौळी ।
नासोनि दुःख भ्रांति तुझी विशेष केली ।
तो काय भक्तजन आपले न तारी ।
मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥३ ॥

मोसा महीवर महिपती नांद तो हे ।
जाऊनि जेजुरी पुरी जगदीश पाहे ।
देऊळ सौख्य तुजवण पूर्ण दयावतारी ।
मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥४ ॥

मोसा महीवर महिपती नांदलो हे ।

तूं का व्यथाचि आमसी जाऊनि त्यासी पाहे ।

तत्काळ तो करील मोक्ष पदाधिकारी ।

मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥५ ॥

संसार दूर करणे म्हणवूनि योगी ।

मल्हारी रूप धारिले अवतार संगी ।

खड्ग करी धरुनिया वाहिले सुरारी ।

मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥६ ॥

मल्हारी देव म्हणली सूर सर्व त्याले ।

मावे कधी नमिली पद पंकजाले ।

भंडार चर्चुन तनू मदनांत करी ।

मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥७ ॥

भावे यथार्थ कायिले व्दिप भीधारणे ।

मावे पडेल नर जो जरि निर्विकारी ।

मार्तंड भैरव म्हणा भव सौख्यकारी ॥८ ॥

---

## खंडोबा — अष्टक ५ वे

असा पातकी सांगु मी काय देवा ।

कधी नाही केली मनोभावे सेवा ।

नसे वंदिले म्या तुझे नीच पाया ।

मला तारीरे तारी मार्तंड राया ॥१ ॥

कधी घातले नाही येक कोट झोळी ।
कधी लाविली नाही म्या निज दिवटी ।
तुझे नाम कैसे वदनी न दाया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥२ ॥

कधी मागिलली नाही म्या तुझी वारी ।
कधी देखिली नाही म्या प्रेम पुरी ।
मनी मागिले नाही हींयासी जाया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥३ ॥

कधी उचलली नाही म्या तुझी टाळी ।
कधी चर्चिन नाही भंडार भाळी ।
देह पुष्ट झाल वृथाशी पहाया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥४ ॥

कधीही मार्गद्वार कुळक बळी ।
हयवाहन देखिले नाही म्या दिव्य दृष्टी ।
मनी हेल हा धूमभारी पहाया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥५ ॥

तुझे महात्म्य मी कोणिके काही कळी ।
तुझे प्रेमळू भक्त मी काय जाणी ।
तुझे दर्शना लगी कुळीच आया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥६ ॥

दिशा दाक्षिणी प्रेमपुरी पहाया ।
मार्तंड अवतार हा पूर्ण देवा ।
तया वर्णिनो वंश माझा तराया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥७ ॥

तुझी अष्टके वर्णिली देव राया ।
कृपा सागरा भवत तुझे तराया ।
भैरव हा वंदिलो नीळ पाया ।
मला तारीरे तारी मार्तंड राया ॥८ ॥

---

## भैरव — अष्टक भैरवाचे

भुजंगासनी रुद्र कालाग्नी व्हेरी ।
प्रलापी बहु दंड त्रिशूळ धारी ।
विधी वर्णिला शब्द कुंठीत झाले ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥१ ॥

बहु चांगले नाम हया नाथजीचे ।
मुखी बोल्ला प्राप्त कैवल्य साचे ।
बहु हल्लो नव्हे सान्निध्य गेल ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥२ ॥

मही दाटली दैत्य भारे कठिनी ।
म्हणे धावा रे पावरे हवळ पाणी ।
धरी देश तो धर्म स्थापावयाला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥३ ॥

क्षमा दाक्षिणी लोचनी रक्तवर्णी ।
म्हणे विघ्न भक्तासी न बाधे म्हणुनी ।
करी मर्दना दुष्ट चांडाळ त्याला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥४ ॥

जिला भाविका देव सन्निध आहे ।
अभाग्या नरा आपुली तो हीन राहे ।
जशी भावना त्या तशी प्राप्त त्याला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥५ ॥

महाराज दाता फार थोर दानी ।
तुझे गाळिली वेद शास्त्री पुराणी ।
नव्हे विन्मुखे शरण येती त्याला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥६ ॥

आणुरेणू ब्रह्मांड पर्यंत सत्ता ।
तुझी वागवी स्वामिया आदिनाथा ।
दिनानाकळे भ्रांतीने भुलविला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥७ ॥

लया विद्या हे वाहिनाले म्हणुनी ।
असा भरवसा नाग नाथासी आला ।
नमस्कार जोगेश्वरीच्या चरणा ॥८ ॥

## देवी — अष्टक देवीचे (१)

लक्ष कोटी चंद्र किरण सुप्रचंड विलसती ।
म्हणे चंद्र बिंबवदन दीप्ती माझी जेजुरी ।
सिंह शिखर अचल वास मल्ल पीठ नायिका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥१ ॥

आवडी अरुण वदन नेत्र कर्ण कुंडले ।
डोलतांती पुष्पहार सुगंध फार दाटले ।
अष्ट दंड बाजुबंद कंकणादि मुद्रिका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥२ ॥

चंदनाळ पद्मराग पांच हिरे साळ ।
धार्यी घोळ कोरमाळ चंद्रहार वेगळा ।
पैंजणादि भूषणांनी लेपविल्या जाटुळा ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥३ ॥

उग्रचाप बाणभूळ खड्ग मिरवे छुरी ।
उग्र दृष्टी पाहलाची काळ झोप अंतरी ।
उग्र सिंह वाहन उग्र ध्यान दैत्य अंतका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥४ ॥

इंद्र दत्त मुनींद्र विष्णु ब्रह्मदेव वंदिली ।
अनादि अंती ठाव राहिल आदिशक्ति भगवती ।
त्र्यंबकं चंबु मुंडु खंडु विखंडु धारी अंबिका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥५ ॥

अचल कोटी ब्रह्मांडु पोटी पूर्वमुख बैसली ।
आदि अंती ठाव राहिल विश्व जननी भारली ।
सव्य भागी दत्त अग्नी वामभागी कालिका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥६ ॥

पर्वतागी वासी पक्षी अंबा अंबा बोलती ।
चारी खाणी वृक्षरानी भवानी ध्यानी डोलती ।
अवतार कल्पसार बंधु मुद्रि तारका ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥७ ॥

धन्य नाथ धाम पुण्य पाहलाची आभा ।
अंबा दर्शनांत भवत अभवत होती आम्ही ।
म्हणूनी विष्णुदास नीळ भवत पाऊल सुखा ।
धर्म अर्थ काम मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥८ ॥

---

## देवी — अष्टक देवीचे (२)

आदिशक्ति आदिमाय सर्व विश्व व्यापिका ।
दुष्ट नष्ट नाशिके निराक्षसा संहारिके ।
ब्रह्म देव विष्णु रुद्र पूजितांती कालिका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥१ ॥

क्रोध काम मत्सरादि पाप ताप हारिणी ।
संत भक्त साधु ह्यासी हर्ष मुक्ति दायिनी ।
माहुरिया भायी लेसी आदिशक्ति रेणुका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥२ ॥

उच्छ मच्छ दीपमान मुखनोही शोभिनी ।
हुंडी हार त्या परीच राखउयादि सांविली ।
पायी पैंजणादि हुंडी चंद्रहार नेटका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥३ ॥

साधुसंत देवीदास दर्शनासी ठाकली ।
स्नान दान तीर्थ पान सर्वसांग सारिली ।
रिद्धी सिद्धी दासी द्वारी आणि अष्टनायका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥४ ॥

आदिकाल थोर मान लोहो कोपरी ।
स्थापिली धरासी लोक जोगवा घरोघरी ।
उत्सवासी नाही पार वर्णु काय मी मुका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥५ ॥

शुद्ध पापी ज्या न ज्ञान अंबा अंबा बोलली ।
वृक्ष वा तळादि ते ही अंबा ध्यानी डोलती ।
दुष्ट कुष्ट सोशिनार जोडलानी घालका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥६ ॥

पापरास ज्ञान काय थोर थोर भागले ।
मागुनी दत्त ते ही माहुरासी सोपले ।
वेदचार कुष्टी फार नेलि नेलि सांगिका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥७ ॥

देई देव पाद भक्ती नेटकेची सांगणे ।
दत्त दास जोडी हस्त राही राही बालका ।
भक्त काम कल्पद्रुम मोक्षदानी अंबिका ॥८ ॥